प्रबोधन
गोरेगाव

# बावीसावा वार्षिक अहवाल

## १९९४-९५

संस्थेच्या उदयोन्मुख क्रिकेटपटूंना आजही त्यांच्या कुशल मार्गदर्शनाचा लाभ होत असतो. श्री. अजित पै गोरेगावचे निवासी असल्याचा संस्थेस सार्थ अभिमान आहे. श्री. अजित पै यांना त्यांच्या क्रिकेटच्या सेवेबद्दल गौरव होणे अपरिहार्यच होते. मुंबई क्रिकेट असोसिएशनने त्यांच्यासाठी गौरवनिधी सामना दिला आणि त्यांचे अनेक चाहते व प्रबोधन क्रीडाभवनाचे सभासद यांनी एकत्र येऊन श्री. अजित पै यांच्यासाठी व 'प्रोजेक्ट-२०००' च्या मदतीसाठी प्रबोधन क्रीडाभवनाच्या क्रीडांगणावर गौरवनिधी सामना शनिवार दिनांक २१ मे १९९४ रोजी आयोजित केला होता. या गौरवनिधी सामन्यास दमानिया एअरवेज, ठाकूर ग्रुप ऑफ कंपनीज्, सहारा इंडिया, आदि मान्यवर उद्योग समूहांचा व व्यक्तिंचा पुरस्कार लाभला होता.

अत्यंत उत्साहवर्धक व हर्षोत्फुल्ल वातावरणात पार पडलेल्या या गौरवनिधी सामन्यास सर्वश्री सुनील गावसकर, मोहींदर अमरनाथ, दिलीप वेंगसरकर, संदीप पाटील अशा मातब्बर व जुन्या जाणत्या कसोटी क्रिकेटपटूंचा त्याचप्रमाणे रोहन गावसकर, प्रविण आमरे, अतुल बेदाडे, मनोज जोगळेकर, अमोल मुजुमदार अशा उदयोन्मुख कसोटी क्रिकेटपटूंचा सहवास लाभला होता. गौरवनिधी सामन्यानिमित्त आयोजित करण्यात आलेली ही सिंगल विकेट स्पर्धा श्री. संदीप पाटील यांनी जिंकली. त्याचदिवशी आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ 'बँक ऑफ बडोदा'चे जनरल मॅनेजर श्री. रतन कपूर यांच्या शुभहस्ते क्रीडांगणावर पार पडला. या सामन्यात कसोटीपटू श्री. रामनाथ पारकर यांच्या नेतृत्त्वाखालील खेळाडूंनी क्षेत्ररक्षणाची जबाबदारी सांभाळली होती.

**प्रबोधन वक्तृत्व स्पर्धा - वर्ष २२ वे**

सध्याच्या स्पर्धात्मक जाहिरातीच्या युगात दुसऱ्यावर छाप पाडण्यासाठी अंगी वक्तृत्व गुण असणे अत्यावश्यक आहे. संस्थेने आपल्या स्थापनेपासूनच सातत्याने वक्तृत्व स्पर्धेचा उपक्रम राबविला व तो यशस्वी केला. अखिल महाराष्ट्र पातळीवरील या स्पर्धेस मुंबईबाहेरील अनेक शाळा व महाविद्यालयांचा सहभाग लाभतो. दूरदर्शन, स्टार टी व्ही व दूरदर्शनवर येणाऱ्या अनेक वाहिन्यांच्या आक्रमणानंतरही संस्थेने सातत्याने या स्पर्धेचे आयोजन केले आहे. यंदाच्या वर्षीच्या या स्पर्धा रविवार दि. २ ऑक्टोबर १९९४ रोजी पाटकर महाविद्यालयात पालक, शिक्षक, विद्यार्थी व श्रोते यांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या.

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ त्याचदिवशी संस्थेचे संस्थापक सदस्य व माजी उपाध्यक्ष श्री. विजय नाडकर्णी यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

# प्रबोधन, गोरेगाव

## २२ वा वार्षिक अहवाल
## १९९४-९५

'प्रबोधन-गोरेगाव'च्या कार्याचा दि. १ एप्रिल १९९४ ते ३१ मार्च १९९५ या कालावधीचा अहवाल व हिशेब पत्रके संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासदांना सादर करतांना आम्हास आनंद होत आहे.

या अहवाल वर्षात संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या एकूण १५ सभा घेण्यात आल्या. स्वीकृत सभासदांसह कार्यकारी मंडळाच्या सभासदांची उपस्थिती संख्या १४ एवढी होती.

**बाविसावा वर्धापन दिन :**

१९७२साली गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर समाजसेवेचे ब्रीद घेतलेल्या काही तरूणांनी एकत्र येऊन 'प्रबोधन, गोरेगाव'चे छोटेसे रोपटे लावले. त्या रोपट्याचा पाहतां-पाहतां विशाल वटवृक्ष झाला व 'प्रबोधन क्रीडाभवना'सारखी दिमाखदार व गोरेगावास भूषण ठरणारी वास्तु उभी राहिली. 'प्रबोधन क्रीडाभवन' हे आता क्रीडाचळवळीचे व अनेक उदयोन्मुख खेळाडूंचे मोठे आशास्थान व श्रद्धास्थान बनले आहे. त्या खेळाडूंचे स्फूर्तिस्थान तर ते आहेच. या सर्व वाटचालीत संस्थेस लाभलेल्या सेवाभावी कार्यकर्त्यांचा तर सिंहाचा वाटा आहे. त्याचप्रमाणे संस्थेच्या स्थापनेपासूनच संस्थेवर मनापासून उत्कट प्रेम करणाऱ्या व प्रत्येक कार्यात भरघोस मदत करणाऱ्या संस्थेच्या सभासदांचे बहुमोल सहकार्य संस्थेस लाभले आहे. अशा कार्यकर्त्यांसाठी व सभासदांसाठी संस्थेचा वर्धापनदिन सोहळा म्हणजेच घरगुती कौटुंबिक स्नेहसंमेलनच.

संस्थेचा यंदाचा हा वर्धापनदिन सोहळा 'प्रबोधन क्रीडाभवना'च्या पटांगणावर गुढीपाडव्याच्या पूर्वरात्री दि. १० एप्रिल १९९४ रोजी संपन्न झाला. त्याप्रसंगी, 'साथसंगत' निर्मित, रंजना जोगळेकर आणि मंगला खाडीलकर यांची 'भावस्वर' ही भावस्पर्शी मैफल आयोजित करण्यात आली होती. त्यात मराठी भावसंगीत व सुगमसंगीताचा आस्वाद रसिकांना घेता आला. या वर्धापनदिन सोहळ्यास मुंबई महानगरपालिकेतील विरोधी पक्षनेते श्री. विश्वनाथ नेरूरकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते शालांत परीक्षेत विशेष यश संपादन करणाऱ्या गुणी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या समारंभास श्री. दिगंबर कांडरकर व श्री. राम म्हात्रे हे नगरसेवक आवर्जून उपस्थित राहिले होते.

शालांत परीक्षेत विशेष यश संपादन करणारे गोरेगावातील गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थीनी पुढीलप्रमाणे:–

**गोरेगावातील मराठी माध्यमाच्या शाळांतून सर्वप्रथम :**

**उत्तेजनार्थ प्रशस्तीपत्रके :**

कु. अनिरूद्ध दफ्तरदार, टिळकनगर विद्यामंदीर, डोंबिवली

कु. रघुनंदन शुक्ल, पेठे हायस्कूल, नाशिक

कु. शितल भगत, बालमोहन विद्यामंदिर, दादर

कु. आर्चिस किशोर सहस्त्रबुद्धे, परांजपे विद्यालय, अंधेरी

**उत्स्फूर्त भाषण स्पर्धा :**

**प्रथम पारितोषिक** (रोख रु. २५०/-)

कु. सतलज दिघे, सरस्वती सेकंडरी स्कूल, ठाणे

**द्वितीय पारितोषिक** (रोख रु. २००/-)

कु. ज्योत्स्ना फडके, पी. आर. हायस्कूल, भिवंडी

**उत्तेजनार्थ प्रशस्तीपत्रके :**

कु. विजय कलमकर, अरविंद गंडभीर हायस्कूल, जोगेश्वरी

कु. रश्मी शहाणे, टिळकनगर विद्या-मंदिर, डोंबिवली

**सतरावा आंतरशालेय क्रीडामहोत्सव :**

प्रबोधनच्या आंतरशालेय क्रीडा-महोत्सवास महाराष्ट्रातील क्रीडा विश्वात अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. या महोत्सवामध्ये वैयक्तिक क्रीडाप्रकारात त्याचप्रमाणे सांघिक क्रीडाप्रकारात नैपुण्य दाखविणारे खेळाडू नंतरही आपल्या क्रीडागुणांची चमक विविध स्पर्धांमध्ये दाखवितात असे आढळून आले आहे. क्रीडा महोत्सवाच्या अत्यंत शिस्तबद्ध व दर्जेदार आयोजनासाठी संस्थेस अनेक मान्यवर क्रीडासंस्थांचे, क्रीडाप्रेमींचे, क्रीडा रसिकांचे त्याचप्रमाणे क्रीडा समीक्षकांचे व क्रीडा पत्रकारांचे व या स्पर्धेच्या आयोजनासाठी झटणाऱ्या अनेक स्वयंसेवी कार्यकर्त्यांचे पाठबळ व साहाय्य सातत्याने लाभत आहे.

या क्रीडामहोत्सवात जर आपल्या अंगच्या गुणांचे दर्जेदार प्रदर्शन केले तर भविष्यात अनेक आव्हानात्मक जिल्हा त्याचप्रमाणे राज्य पातळीवर घेण्यात येणाऱ्या स्पर्धांत भाग घेण्याची संधी मिळेल याची जाणीव मनात ठेवूनच खेळाडू या क्रीडा-महोत्सवात सहभागी होतात व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक या क्रीडा-महोत्सवात भाग घेण्यासाठी खेळाडूंना प्रोत्साहन देतात.

या वर्षीचा हा क्रीडामहोत्सव दि. १२ ते १८ डिसेंबर १९९४ या दरम्यान प्रबोधन क्रीडाभवनाच्या क्रीडांगणावर आयोजित करण्यात आला होता. या क्रीडामहोत्सवास वांद्रे ते दहिसर या पश्चिम उपनगरातील ९५ शाळांतील ५००० हून अधिक खेळाडूंचा सहभाग लाभला होता. या क्रीडामहोत्सवात अनेक नवीन विक्रमांची नोंद खेळाडूंनी केली

**विशेष आभार :**

'प्रबोधन'च्या आजवरच्या दमदार वाटचालीमध्ये व यशामध्ये प्रबोधनचे सर्व सक्रिय कार्यकर्ते, सभासद, पत्रकार, क्रीडासमीक्षक, व देणगीदारांचे पाठबळ संस्थेस सतत लाभले आहे. संस्थेने राबविलेल्या 'प्रोजेक्ट २०००' व आगामी प्रबोधन क्रीडाभवनाचा विस्तार व वाढ यासाठी निधीची आवश्यकता आहे. त्यासाठी सतत मोठ्या आर्थिक पाठबळाची गरज संस्थेस भासणार आहे. संस्थेवर लोभ करणाऱ्या अनेक मान्यवर संस्था व व्यक्तिंचा लोभ सतत वृद्धिंगतच होत गेला आहे व त्यांच्याबरोबर असलेले संस्थेचे ऋणानुबंध सतत वाढतच गेले आहेत. त्या सर्वांचा याठिकाणी उल्लेख करणे अशक्यच आहे. परंतु संस्थेस सतत आर्थिक पाठबळ देणारे देणगीदार, दानशूर व्यक्ति व संस्था त्याचप्रमाणे गोरेगावचे नगरसेवक, आमदार या सर्वांची संस्था अत्यंत ऋणी आहे. त्या सर्वांबरोबरचे ऋणानुबंध व प्रेम सतत वृद्धिंगतच होत राहिल याचा आम्हांस मनापासून विश्वास वाटतो.